सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, १२ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५८ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान केल्याच्या घटनेनंतर एक्स वरुन सरकारला इशारा

## खबरदार, संविधानाला हात लावाल तर... : डॉ. नितीन राऊत

### राज्यात संविधानाला धोका निर्माण करणारी राजकीय व्यवस्था सध्या सत्तेत; बंदचे समर्थन

परभणी/नागपूर/मुंबई : परभणीत काही समाजकंटकांनी संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ भारतीय संविधानाची तोडफोड केली. यानंतर काँग्रेसचे जेष्ठ नेते महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत चांगलेच आक्रमक झाले आहेत. त्यांनी, 'खबरदार, संविधानाला हात लावल तर' असा इशारा आपल्या एक्स अकाउंट वरून सरकारला दिया. यावेळी त्यानी घडलेल्या घटनेचा निषेध करीत परभणी बंद ला समर्थन देखील जाहीर केले.

यावेळी देशात व राज्यात असणारे भाजप सरकार अन्यायी व अत्याचारी सरकार आहे. सत्तेवर आल्यापासून देशात आणि राज्यात जाती-जातीत, धर्मा-धर्मांत मतभेद निर्माण करीत आहे. ज्या विचारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची घटना लिहिली, त्या घटनेची, संविधानाची सरकारकडून पायमल्ली होत असल्याचा आरोप डॉ. राऊत यांनी केला. परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संविधान प्रतिकृतीची तोडफोड करण्यात आली. ही निंदनीय घटना सुनियोजित कट तर नाही? असा प्रश्न उपस्थित करून डॉ. राऊत यांनी परभणी येथील संविधान प्रतिकृती तोडफोडीच्या घटनेचा तीव्र शब्दांमध्ये निषेध केला.

यावेळी बोलतांना डॉ. राऊत म्हणालेत, आपल्या देशातील नागरिकांना एका धाग्यात ठेवण्याचे आणि सर्वांना समान न्याय देण्याचे महत्त्वपूर्ण काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून केले आहे. मात्र, केंद्र आणि राज्यात संविधानाला धोका निर्माण करणारी राजकीय व्यवस्था सध्या सत्तेत कार्यरत असून, त्यांचे मनसुभे आपल्याला मिळून उधळायचे आहे. भाजपाला देशाच्या भवितव्याची चिंता नसून मनुवादी विचारांच्या ऱ्हासाची चिंता आहे. या घटनेवरून हे सिद्ध झाले आहे की राज्यातील भाजप प्रणित सरकार ला संविधान बाजूला सारून देशात आणि राज्यात मनुस्मृती लागू करायची आहे. पुढे बोलतांना डॉ. राऊत म्हणालेत, सध्याच्या काळात धर्मांध विचारांच्या लोकांकडून राज्यघटनेला धोका निर्माण झाला आहे. संविधानिक मूल्यांना पायदळी तुडवून राज्याचा कारभार चालविला जात आहे. परभणी येथे मनुवाद्यांकडून संविधानाची तोडफोड करण्यात आली. याप्रकरणी राज्य सरकारने तात्काळ दखल घ्यावी. या घटनेच्या आरोपीचा मास्टरमाईंड कोण ? हे कृत्य करून दंगलीचे षडयंत्र रचले तर नाही ना? याचा सखोल तपास करून आरोपीवर कठोर कारवाईची मागणी डॉ. राऊत यांनी केली.

## सासरच्या निरपराध लोकांना त्रास देण्यासाठी हुंडाविरोधी कायद्याचा गैरवापर थांबवा



नवी दिल्ली : बंगळुरूतील इंजिनीअर तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना ताजी असतानाच, आता सर्वोच्च न्यायालयाने (डींशिशाश उेीीं) हुंडाविरोधी कायद्याच्या गैरवापरावर चिंता व्यक्त केली आहे. महिलांकडून सासरची मंडळी आणि त्यांच्या नातेवाईकांना त्रास देण्यासाठी हुंडाविरोधी कायद्यातील तरतुदींचा गैरवापर केला जात असल्याच्या प्रकारांवर सर्वोच्च न्यायालयाने महत्वाची टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, स्त्रिया हा कायदा पती आणि त्याच्या कुटुंबाशी त्यांच्या वैयक्तिक वादासाठी एक शस्त्र बनवतात आणि अशा प्रकरणांमध्ये बिनबुडाचे आरोप केले जातात. अशा महिलांकडून सासरच्यांविरुद्ध विशिष्ट आरोप नसलेल्या अस्पष्ट तक्रारी लवकर फेटाळल्या जाव्यात, कायद्याचा प्रतिशोधात्मक हेतूंसाठी वापर करण्यापासून रोखण्यासाठी न्यायालयाने जोर दिला.

न्यायमूर्ती बी व्ही नागरथना आणि एन कोतीश्वर सिंग यांच्या खंडपीठाने सांगितले की, अशा प्रकरणांमध्ये अस्पष्ट आरोपांच्या आधारे फौजदारी कारवाई करण्यास परवानगी दिली जाऊ नये. वैवाहिक विवादातून उद्भवलेल्या फौजदारी खटल्यातील कुटुंबातील सदस्यांच्या नावाचा केवळ संदर्भ, त्यांचा सक्रिय सहभाग दर्शविणारा विशिष्ट आरोप न ठेवता अधिक चौकशी केले पाहिजे. हे एक न्यायालयीन अनुभवातून आलेले सर्वमान्य सत्य आहे. जेव्हा वैवाहिक कलहातून घरगुती वाद उद्भवतात तेव्हा पतीच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना गुंतवून ठेवण्याची प्रवृत्ती असते. ठोस पुरावे किंवा विशिष्ट आरोपांद्वारे असमर्थित व्यापक आरोप फौजदारी खटल्याचा आधार बनू शकत नाहीत, असे त्यात म्हटले आहे.

कायदेशीर तरतुदी आणि कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर टाळण्यासाठी आणि निष्पाप कुटुंबातील सदस्यांचा अनावश्यक छळ टाळण्यासाठी न्यायालयांनी अशा प्रकरणांमध्ये सावधगिरी बाळगली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

आयपीसीच्या कलम ४९८ए चा समावेश सुधारणेच्या मार्गाने एखाद्या महिलेवर तिच्या पतीने आणि त्याच्या कुटुंबाद्वारे केल्या जाणाऱ्या क्रौर्याला आळा घालण्यासाठी, राज्याद्वारे त्वरीत हस्तक्षेप सुनिश्चित करण्यासाठी होता. तथापि, अलिकडच्या वर्षांत, वैवाहिक संबंधांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. वाद, विवाहसंस्थेतील वाढत्या कलहासह, परिणामी, गैरवापर करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आयपीसीच्या कलम ४९८ए सारख्या तरतुदी पत्नीद्वारे पती आणि त्याच्या कुटुंबाविरूद्ध वैयक्तिक सूड उगवण्याचे साधन म्हणून केले जात असल्याचे न्यायलयाने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने (डींशिशाश उेीीं) हे देखील सांगितले की, त्यांचा उद्देश असा नाही की, क्रूरता सहन केलेल्या कोणत्याही महिलेने गप्प राहावे आणि तक्रार करण्यापासून किंवा कोणतीही फौजदारी कारवाई सुरू करण्यापासून स्वत:ला परावृत्त करावे. तिने शांत बसून तक्रार करु नये, असा उद्देश नाही. परंतु अस्पष्ट आरोपांवर कारवाई करताना सावधगिरी बाळगली पाहिजे. जेणेकरून कायद्याचा वापर बदला घेण्यासाठी होऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

## जमावबंदीचा आदेश; इंटरनेट सेवा राहणार बंद, सर्व टेलीफोन, भ्रमणध्वनी, झेरॉक्स केंद्र, ध्वनीक्षेपके बंद

### भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे जिल्हाधिकार्यांचे आदेश जारी








परभणी ता.११ परभणी शहरातील तणावाच्या स्थितीच्या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी रघुनाथ गावडे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ मधील प्राप्त अधिकाराचा वापर करून आदेश जारी करत परभणी शहर व जिल्हयामध्ये सार्वजनिक ठिकाणी पाच व्यक्ती पेक्षा जास्त व्यक्तींना जमा होण्यास प्रतिबंध केला आहे. तसेच सर्व टेलीफोन, एसटीडी, भ्रमणध्वनी, आयएसडी, फॅक्स केंद्र, झेरॉक्स केंद्र व ध्वनीक्षेपके व इंटरनेट सेवा बंद ठेवण्याबाबत आदेशित केले आहे. हे आदेश कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद केले आहे.

आदेशात म्हटले आहे की, परभणी शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोरील संविधानाच्या प्रतिकृतीचे एका इसमाने नुकसान केल्याने जमावाने शहरात तणाव निर्माण केला असल्यामुळे परभणी शहरात ताण-तणावाचे वातावरण तयार झाले आहे. लोक गटा-गटाने पुतळ्याच्या बाजूस येऊन घोषणाबाजी करीत आहेत. तसेच त्याबाबतचे व्हिडीओ प्रसारीत करीत आहेत. जिल्हयात कलम ३७ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश लागू असतानासुध्दा या आदेशास न जुमानता आंदोलनास पाठींबा देण्यासाठी परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाशेजारी मोठ्या प्रमाणात जमाव जमून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पुढील कालावधीत शहरात व जिल्ह्यात तणावाचे वातावरण निर्माण होवू नये म्हणून परभणी शहर व जिल्हयात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ लावण्याबाबत पोलीस अधिक्षकांनी विनंती केली आहे. त्यानुसार हे आदेश काढले आहेत.

हे आदेश दिनांक ११ डिसेंबर रोजी दुपारचे १ वाजल्यापासून पुढील आदेशापर्यंत लागू राहतील. तसेच प्रत्येक इसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्याने हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिसांनी जाहीर करुन त्यास प्रसिध्द करावे असेही आदेशात म्हटले आहे.




## परभणी शहरात उसळली दंगल; जिल्हाधिकारी यांच्या सह सर्व पक्षीय नेत्यांनी केले शांततेचे आवाहन!



परभणी - जिल्हाधिकारी कार्यालया समोरील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संविधानाच्या प्रतिकात्मक प्रतीमे वरील काचेवर एका माथेफिरू ईसामने दि (१० )मंगळवार रोजी दुपारी चार नंतर दगड मारून ती काच फोडली. हि घटना शहरात वाऱ्या सारखी पसरली व तात्काळ शहरातील शेकडो आंबेडकरी अनुयायी आंबेडकर पुतळ्या समोर जमा झाली व त्यांनी या घटनेचा निषेध करण्यास सुरुवात केली. शहरात काल काही ठिकाणी दगड फेकीचे प्रकार घडले जिल्हा प्रसासन व पोलीस प्रशासनाने घटनेची तीव्रता ओळखून आंबेडकरी जनतेला शान्ततेचे आवहान करून शहरात शांतता प्रस्थापित केली. दरम्यान पोलिसांनी या माथेफिरू इसमास अटक केली आहे.

काल घडलेल्या या घटनेचा निषेध म्हणून आंबेडकरी संघटना कडून आज दि.( ११)बुधवार रोजी शहारा सह जिल्ह्यात बंद चे आवहान करण्यात आले होते या आवाहणाला सकारात्मक प्रतिसाद देत शहरातील व्यापाऱ्यांनी आप आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली तसेच शैक्षणिक संस्था ही बंद ठेवण्यात आल्या. दुपार पर्यंत शांततेत चाललेल आंदोलन दुपारी अचानक हिंसक बनलं व स्टेशन रोड वरील विसावा कॉर्नर परिसरातील दुकाना समोर टायर जाळपोळी चे प्रकार घडले दुकाना समोरील शेती चे पाईप मोठ्या प्रणात जाळण्यात आले तसेच या परिसरातील तसेच आर आर टॉवर, गांधी पार्क परिसरातील गाड्या जाळण्यात आल्या.दरम्यान शहरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून पोलीस प्रशासन शांतता प्रथापित करण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयाची संतप्त महिला कडून तोडफोड

जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी शांततेच आवाहन करण्या साठी काही आंबेडकरी अनुयायांची त्यांच्या दालनात बैठक बोलावली होती ही बैठक संपवून आंबेडकर अनुयायी जिल्हाधिकारी कार्यालया बाहेर पडत असताना संतप्त महिलांचा एक गट जिल्हाधिकारी कार्यालयात घुसला व त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालना सह सर्व कार्यलयाची तोडफोड केली.

## संविधान प्रतिमेची विटंबणा केल्या प्रकरणी मानवतमध्ये जनतेकडून कडकडीत बंद



मानवत / प्रतिनिधी.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील जे संविधान होतं ज्या अज्ञात समाजकंटकांनी दगडफेक करून त्याची परिसराची नासधूस केली त्या समाजकंटकांवर देशद्रोहाचा गुन्हा नोंद झाला पाहिजे तसेच या माघे ज्या व्यक्ती , संस्थाचा हाथ असेल या गोष्टी ची शाहनिशा करून त्यांना पण योग्य ती कारवाई करण्यात यावी या मुळे अशी मागणी आज रोजी दिनांक ११-१२-२०२४ रोजी मानवत बंदच आवाहन आंबेडकर प्रेमी जनतेने केल होते. त्यामूळे आज सकाळ पासूनच शिव फुले शाहू आंबेडकरवादी आणि संविधान प्रेमी मानवतकरांनी कडकडीत बंद ठेऊन घटनेचा निषेध व्यक्त केला.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षातही काही आंदोलनकर्त्यांचा गदारोळ

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या कक्षासह कार्यालयातसुध्दा काही आंदोलनकर्त्यांनी बुधवारी दुपारी प्रचंड घोषणाबाजी करीत गदारोळ घातला. बुधवारी सकाळपासून संपूर्ण शहरात अभूतपूर्व तणाव होता. विशेषतः आंदोलनकर्त्यांपैकी काही युवकांनी मध्यवस्तीसह चोहोबाजूंच्या रस्त्यांवर ठिकठिकाणी ठाण मांडले. पाठोपाठ बाजारपेठांमधून प्रचंड दगडफेक केली. काही वाहनांनाही लक्ष केले. जाळपोळीचाही प्रयत्न केला. त्या पाठोपाठ दुपारी काही संतप्त महिला कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकार्यांशी चर्चेच्या निमित्ताने कक्ष गाठून प्रचंड घोषणाबाजी केली. त्यातच जिल्हाधिकार्यांच्या टेबलवरील कागदपत्रे उधळून लावली. मोठा आरडाओरडा करीत गदारोळ घातला. कार्यालयातसुध्दा हा गदारोळ सुरु होता. काही पोलिस कर्मचारी व महसूलच्या काही कर्मचार्यांनी या आंदोलीनकर्त्यांनी समजूत काढून त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

